I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 150-153
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# ग्रामीण साहित्य व ग्रामीण विकास

मोक्षदा नाईक

सहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन वरोरा
Corresponding Author : mokshadamanohar77@gmail.com

Communicated :21.03.2022 | Revision : 27.03.2022 Accepted :30.03.2022 | Published: 02.05.2022

**सारांश :**
साहित्य आणि समाज यांचा नेहमीच परस्पर संबंध राहिलेला आहे. समाजाचे चित्रण साहित्यात उमटत असतेच आणि साहित्यातून ही समाजाला एक दिशा मिळत असते. मग ते साहित्य जर समाजाशी, समूहाचे जोडणारे असेल तर आपसूकच त्यातील विचारांचे, कृतीचे समाज समर्थन करत असतो. ग्रामीण साहित्य हे ग्रामीण समूहाशी, ग्रामीण समाजाशी जोडणारे साहित्य आहे. ग्रामीण जीवनाचे, ग्रामसंस्कृतीचे ग्रामपरंपरेचे, ग्रामीण चालीरीतींचे आणि त्यासोबतच ग्रामीण समस्यांचे दर्शन ग्रामीण साहित्यातून प्रभावीपणे व्यक्त होत आले आहे. साहित्याला सामाजिक बांधिलकीचे मुल्य असते. कारण साहित्य हे केवळ रंजनासाठी नसते, तर समाजात ज्या समस्या आहेत त्या समस्यापर्यंत पोहोचण्यासाठी साहित्याचा उपयोग होत असतो. आणि यालाच आपण सामाजिक बांधिलकी म्हणतो, आणि ही सामाजिक बांधिलकी बाळगूनच काही लेखक सातत्याने लेखन करत असतात. ग्रामीण साहित्याचा आणि ग्रामीण विकासाचा विचार करताना सामाजिक बांधिलकीचे हे तत्त्व अनेक लेखक पाळताना दिसतात. ग्रामीण परिसरातील शेतकऱ्यांच्या, दलितांच्या, अशिक्षितांच्या, बेरोजगारीच्या, ग्रामीण विकासाच्या समस्यांना, ग्रामीण साहित्य हे नेहमीच तोंड फोडत असल्याचे आपल्याला दिसून आलेले आहे. प्रत्यक्षपणे साहित्यातून त्या समस्या स्पष्ट झाल्या म्हणजे त्या सुटल्या असे नसते. परंतु व्यापकपणे शिक्षीत समाजासमोर, वाचकांसमोर त्या समस्या तो लेखक घेऊन जात असतो आणि त्याचा कुठेतरी फायदा हा ग्रामीण विकासासाठी होत असतो. ज्याप्रमाणे अनेक सामाजिक चळवळीतून साहित्य हे मोठे झालेले आपण पाहतो, त्याचप्रमाणे अनेक साहित्यिक चळवळीतून सामाजिक परिवर्तन झालेले ही आपणास दिसून आले आहे. ग्रामीण साहित्याची चळचळ ही ग्रामीण विकासासाठी कारणीभूत झाल्याचे आपल्याला अनेक लेखकांच्या लेखनातून आढळून आले आहे. अनेक ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जाणीव निर्माण करणारे साहित्य लिहिले आणि मग ग्रामीण भागातील सामाजिक काम करणाऱ्या लोकांनी या साहित्यातून गावाला विकासाच्या दिशेने पुढे नेले. ग्रामीण विकासाची चळवळ ही सामाजिक पातळीवर राबत होती त्यातून मग त्या साहित्याला बळ मिळत गेले. अशा रीतीने कुठेतरी ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण विकास यांचा परस्पर संबंध असल्याचे आपणास दिसून येतो.
**बीजशब्द :** ग्रामीण साहित्य, ग्रामीण विकास, सामाजिक परिवर्तन, सामाजिक बांधिलकी, ग्रामीण जाणीव.

**प्रस्तावना :**
१९४५ पासून जाणीवपूर्वक ग्रामीण जीवन दर्शन करण्याचा प्रयत्न मराठी साहित्यात सुरू झाला. तसेच पाहिले तर महात्मा गांधींच्या ग्राम उध्दाराचा प्रभावी उपक्रम मराठी साहित्यात सुरू झाला. तसे पाहिले तर महात्मा गांधीजींच्या ग्राम उध्दाराचा प्रभावी उपक्रम मराठी ग्रामीण साहित्याची प्रेरणा होऊ शकतो. कारण महात्मा गांधीजींच्या 'खऱ्या भारत खेड्याकडे आहे', 'खेड्याकडे चला' असा नारा घेऊन अनेक सुशिक्षीत तरुणांनी त्यावेळी खेड्याकडे धाव घेतली. खेडी सुधारतील तर देशात सुधारणा होईल अशा आशयाचा विचार घेऊन तरुण खेड्यात ग्रामविकासाचे उपक्रम राबवायला लागले आणि त्यातूनच या तरुणांनी हाती लेखणी घेतली आणि त्यांच्या लिखाणातून १९२५ नंतर चे खेडे मराठी साहित्यात उमटू लागले.

**ग्रामीणत्व :**
साहित्यातील ग्रामीण हा शब्द 'ग्राम' या शब्दावरून मराठीत आला आहे, आणि संस्कृत ग्राम चा मराठीत अर्थ आहे. 'गाव' म्हणून जेजे गावाकडील किंवा गावाशी निगडित असतील ते ग्रामीण असे सरळ–सरळ आपणास म्हणता येते. आणि त्यामुळेच एखाद्या साहित्यकृतीमध्ये प्राधान्याने गावातले असे काही जे वर्णन् येत असेल तर त्या साहित्यकृतीतील ग्रामीण साहित्य अशी संज्ञा देता येईल. थोडक्यात काय तर ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी लिहिलेले, ग्रामीणांबद्दल लिहिलेले, ग्रामीणांकरता लिहिलेले असे साहित्य, ज्यात खेडेगांव, तेथील जीवनपध्दती, तेथील असणाऱ्या खास रीती, शेती, निसर्ग, मातीशी नाते असणारे मानवी मन, ग्रामसंस्कृती, प्रादेशिक वैशिष्ट्ये अशा सर्व गोष्टींचा उहापोह ज्या साहित्यात येते त्या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हटल्या जाते.

**ग्रामीण साहित्य :**
आज ग्रामीण साहित्याला मराठी साहित्यात एक स्वतंत्र स्थान प्राप्त होण्याचे कारण म्हणजे त्याची व्याप्ती. ग्रामीण साहित्य ही संकल्पना १९६० नंतर मराठी साहित्य चर्चेत

समाविष्ट झाल्याचे दिसून येते. १९६० नंतर उदयाला आलेल्या अनेक प्रवाहांपैकी ग्रामीण साहित्य हा प्रकार एक महत्त्वाचा साहित्य प्रवाह मानला गेला. प्राचीन साहित्यातील संत साहित्यात ग्रामीण जीवनाचे संदर्भ येतात, आणि ते येणे स्वाभाविक होते. कारण संत ग्रामीण भागात राहत आणि ते त्या ग्रामजीवनाशी परिचित होते. त्यांच्या समोरचा समाज हा ग्रामीण होता. कारण मुळात त्यावेळेला शहर ही संकल्पना अस्तित्वात नव्हती त्यामुळे जे काय निर्माण झाले ते बहुतांशी या ना त्या प्रकारे ग्रामजीवनाचा संदर्भ असणारे असेच होते. त्यानंतर आधुनिक ग्रामीण साहित्याची निर्मिती एकोणिसाव्या शतकात फुल्यांच्या लेखनापासून सुरू झाली होती असे म्हणता येते. ग्रामीण समाज माणसांच्या समस्या बाबतीत सर्वात प्रथम महात्मा फुले यांनी पुढाकार घेतला आणि आपल्या साहित्यातून त्यांच्या दु:खांना वाचा फोडली. 'शेतकऱ्यांचा आसूड' या पूस्तकातून ग्रामीण साहित्याची बीजे पहिल्यांदा आलेली दिसतात. फुल्यांपासून सुरू झालेली ही ग्रामीण साहित्य लेखनाची परंपरा पुढे हरिभाऊ आपटे, वी.स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या कथांतून तर पुढे रविकिरण मंडळातील कवी मंडळी यांच्या कवितेतून प्रभावीपणे यायला लागली. ग्रामीण जीवनाचे ते वास्तव चित्रित करत होते. ग्रामीण कादंबरी च्या संदर्भात र.वा. दिघे यांच्या 'पानकळा' व 'सराई', ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड' शिवाय म.भा. भोसले, द.र. कवठेकर, वि.द. चिंदरकर यांच्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे व त्यासोबत आदिवासी जमातीचे ही चित्रण यायला लागले.

१९४५ नंतर आलेल्या नवसाहित्याच्या पार्श्वभूमीवर मराठी ग्रामीण साहित्यात व्यंकटेश माडगूळकरांनी गावाकडच्या गोष्टी सांगायला सुरूवात केल्या नंतर मराठी ग्रामीण कथेला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. १९४५ च्या सुमारास मौज सत्यकथेतून व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण मराठी कथेला एक वेगळी दिशा दिली. माडगूळकऱ्यांसोबत द.मा. मिरासदार, शंकर पाटील, अण्णाभाऊ साठे, आनंद यादव, शंकरराव खरात, हमीद दलवाई, रणजित देसाई, बाबा पाटील, रा. रं. बोराडे, चारुता सागर यासारख्या कथाकारांनी मराठी ग्रामीण साहित्यात मोलाचे काम केले.

व्यंकटेश माडगूळकरांनी नवकथेची लेखन वैशिष्ट्ये आत्मसात करून ग्रामीण कथेला वास्तववादी बनवल्यामुळे त्यांच्यानंतर ग्रामी लेखकांची एक नवी परंपरा उदयाला आली. आणि ही ग्रामीण लेखकांची परंपरा साधारणपणे १९६० च्या आसपासची होती. डॉ. आनंद यादव म्हणतात, 'देशाला स्वातंत्र्य मिळून गेले होते, बहुजन समाजाची अस्मिता जागी होत होती, आजवर आपले जिणे लाजिरवाणे ही जी बहुजन समाजाची भावना होती ती लोप पावली, नवे हक्क, नव्या सुखसोई, नवे कायदे, नवी अधिकार क्षेत्रे यामुळे सर्वांना नव्याने वाचा फुटली. दुसऱ्या बाजूने साहित्यातील अनुभवनिष्ठा, आत्मनिष्ठा, कलानिष्ठा यांना विशेष स्थान प्राप्त झाले. बहुजन समाजातून प्रत्यक्ष अनुभव असलेले ग्रामीण लेखक जाणता–अजाणता निर्माण झाले. या काळात कोकण, सातारा, कोल्हापूर, खानदेश, मराठवाडा, विदर्भ आदी भागातून अनेक ग्रामीण लेखक नव्याने ग्रामीण कथा लिहू लागले. उध्दव शेळके, रणजित देसाई, बाबा पाटील, मधू मंगेश कर्णिक, रा.रं. बोराडे, बा. भ. पाटील, आनंद यादव, बजरंग शेलार इत्यादी सर्व लेखकांच्या ग्रामीण साहित्य प्रवाह नावाचा एक वेगळा साहित्य प्रवाह उदयाला आला. एखाद्या विशिष्ट कालखंडातील सामाजिक, वाङ्मयीन परिस्थितीतून विभिन्न साहित्यप्रवाह निर्माण होत असतात व त्यांचा उदय विकासासोबत त्याचा नाश ही संभवू शकतो. १९६०–७० च्या दशकात ग्रामीण साहित्यात सातत्यपूर्ण निर्मिती झालेली दिसते आणि हा ग्रामीण साहित्य प्रवाह पुढे अधिकाधिक विकसित होत गेला. ऐशीच्या दशकात तर या साहित्य प्रवाहाने चळवळीचे रूप धारण केले. १९७७च्या आसपास ग्रामीण साहित्याची चळवळ उदयाला आली.

**ग्रामीण साहित्य चळवळ :**

१९७७ ला सुरूवात झालेल्या ग्रामीण साहित्य चळवळीच्या उदयास १९७० ते ८० च्या दशकातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व साहित्यिक घटना–घडामोडी निश्चितच महत्त्वाच्या आहेत. याच सुमारात म्हणजे १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. १९५१–५२ च्या सार्वत्रिक निवडणुकांचा प्रारंभ झाला. १९५१–५२ चा पहिला सहकारी साखर कारखाना व सहकाराचे नवे युग उदयास आले. याचवेळी सावकारशाहीच्या विळख्यातून ग्रामीण समाज मुक्त होऊ लागला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर शिक्षण प्रसाराला गती मिळाली. आणि शिक्षणामुळे ग्रामीण भागात जनजागृती होऊ लागली. १९५१ ते ६६ या कालखंडातील तीन पंचवार्षीक योजनांमुळे शेतीला अग्रक्रम देण्यात आला. दळणवळण, तंत्रज्ञान, शिक्षण या योजनांचा विकास आराखडा तयार करून तो कार्यान्वित करण्यात आला. आर्थिक स्वावलंबनाचा हेतू समोर ठेवून आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. सहकारी योजना, बचत योजना यासोबतच धरणे, गाव पातळीवरील रस्ते, टेलिफोन, रेडिओ, नियतकालिके, शाळा–महरविद्यालय, दवाखाने इत्यादींना महत्त्व दिले जाऊ लागले. ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषद, इत्यादींचा प्रसार होऊ

लागला आणि त्यातून ग्रामीण नेतृत्व उदयाला आले. शिक्षणाचे प्रमाण झपाट्याने वाढू लागले. शैक्षणिक सवलती जाहीर झाल्या, विविध सामाजिक स्वयंसेवी संस्था निर्माण होऊ लागल्या आणि यातून ग्रामविकासाला एक दिशा मिळायला लागली. पण आदर्शाची पातळी आणि वस्तुस्थिती यात कमालीची तफावत नंतर पडायला लागली कारण योजना चांगल्या होत्या पण राबविणाऱ्या नोकरशाहीने त्याचा खेळखंडोबा करून टाकला, त्याच वेळेला १९७० ला झालेला लोकसंख्येचा विस्फोट त्यामुळे सुशिक्षित बेकारांची संख्या वाढू लागली. खेड्यातील पारंपारिक व्यवसाय उध्वस्त झाले. 'उष:काल होता होता काळरात्र होते की काय' अशी अवस्था दिसू लागली पण त्याच वेळेला ग्रामीण भागात आणि बहुजन समाजात जन्मलेला संवेदनशील सर्जनशील तरुण लेखक हे नुसते पाहातच होता असे नाही तर कमी–अधिक प्रमाणात त्याच्या स्वत:च्या कुटुंबियाच्या वाट्याला आलेला अनुभव ही तो टिपत होता आणि यातूनच त्याला जाणवणारे ग्रामीण शोषित माणसाच्या मनाचे ताण–तणाव त्याच्या हातून चित्रित होऊ लागले आणि अशा प्रकारचे लेखन करणाऱ्या लेखकांना आपल्या परीने एकत्र आणण्याचा प्रयत्न आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, रा. रं. बोराडे करीत होते. १९७७ साली ग्रामीण साहित्यिकांचा जो पहिला मेळावा घेतला गेला. तो पुढील ग्रामीण साहित्य चळवळीचा प्रारंभ ठरला. या चळवळीतून नवशिक्षित ग्रामीण तरुणांच्या मनात ग्रामीणांचे प्रश्न रुजल्या गेले आणि त्याला पुढे लेखनाचे स्वरूप प्राप्त झाले. ग्रामीण साहित्याची चळवळ, परिवर्तनवादी विचार व ग्रामीण विकास कोणतीही चळवळ ही परिवर्तनवादी असते. विचारांचा बदल करणारी असते. ग्रामीण साहित्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर या साहित्य चळवळीने एक परिवर्तनवादी विचार लेखकांमध्ये रुजवला आणि तो विचार पुढे घेऊन लेखक लिहिते झाले. कोणते ही परिवर्तन हे विकासासाठी कारणीभूत ठरत असते. अर्थात प्रत्येक वेळेला एखादा चळवळ किंवा एखादा परिवर्तन हा विकास घडवतोच असे नाही पण विकास घडवण्यासाठी कारणीभूत ठरत असतो.

ग्रामीण वास्तवाचे प्रत्ययकारी कलात्मक चित्रण साहित्यात यावे, ग्रामीण साहित्य हेच खरे मध्यवर्ती साहित्य असले पाहिजे या उद्देशातून सुरू झालेली ग्रामीण साहित्याची चळवळ पुढे अधिकाधिक विचार संपन्न होत गेलेली दिसते. या चळवळीची भूमिका सतत विकासाची राहिलेली दिसते. मुळात ग्रामीण साहित्य चळवळ शहरी माणसांविरूध्द नाही, शहरी साहित्यविरोधी ही नाही. ती ग्रामीण माणसासाठी त्याच्या साहित्यासाठी त्याच्या विकासासाठी अवकाश शोधणारी चळवळ आहे. मुळात सामाजिक परिवर्तनासाठी साहित्याची आधार भूमी शोधली जाते. इतर कलांकडून अशा स्वरूपाची अपेक्षा केली जाऊ शकत नाही. ग्रामीण साहित्याचे सामाजिक संस्कृती, आर्थिक, भाषिक योगदान हे ग्रामीण विकासासाठी परिवर्तनवादी ठरल्याचे दिसून येते. विषमता नष्ट व्हावी. समाज शोधनमुक्त व्हावा. उपेक्षित सर्व माणसांना न्याय मिळावा. त्यांचे हक्क त्यांना प्राप्त व्हावे. ह्या साहित्यातून एक नवी जाणीव समाजात निर्माण व्हावी अशी सामाजिकतेच्या संदर्भात व्यापक भूमिका ह्या चळवळीने घेतली असल्याचे दिसते. नागनाथ कोतापल्ले, भास्कर चंदनशिव यांनी अशा प्रकारची मांडणी केली आहे. ग्रामीण भागातील नवशिक्षित तरूणाईला त्यांचे जीवन, जीवनातील समस्या यांचे नेमके भान यावे, ते त्यांनी आपल्या साहित्यातून मांडावे. स्वत:च्या जीवनाचे वास्तव चित्रण करावे, आणि या चित्रणातून त्याला प्रस्थापित व्यवस्थेची लढण्याचे बळ मिळावे असा विश्वास त्यांच्या ठायी निर्माण करण्याचे काम ग्रामीण साहित्य चळवळीने केले आणि हे या चळवळीचे सामाजिक योगदान आहे. अशा विचाराने प्रेरित होऊन मग एखादा तरुण किंवा एखादा समूह आपल्या गांवामध्ये परिवर्तन करू शकतो आणि गाव विकासाला कारणीभूत ठरू शकतो असे म्हटल्यास वावगे ठरणार आहे. यासोबतच या चळवळीचे अजून एक महत्वाचे काम म्हणजे

आधुनिकतेला समोर जाताना आपण आपली ग्रामसंस्कृती कशी टिकून ठेवायची, परिवर्तनाला सामोरे जाताना स्वत:चे सत्व नष्ट न होऊ देता ते कसे अबाधित ठेवायचे, आपल्या स्व–संस्कृतीची आणि आधुनिकतेची उत्तम रीतीने जोड कशी घालायची, मुळात आपल्या प्रथा–परंपरा, सणवार कसे जोपासायचे याचे चित्रण ग्रामीण साहित्यात यायला लागले. गावाच्या विकासासाठी या गोष्टी अत्यंत आवश्यक ठरतात आणि म्हणून ग्रामीण चळवळीचे सांस्कृतिक योगदान ही गावाच्या विकासासाठी तितकेच महत्त्वाचे आहे. याशिवाय या ग्रामीण साहित्य चळवळीने भाषिक योगदान दिलेले आहे, तेही तितकेच महत्वाचे. आज जगातील एक–एक भाषा नष्ट होत चाललेली आहे. प्रत्येक भाषा ही आपल्या संस्कृती, परंपरा जोपासण्याचे काम करत असते. गावातील संकेत हे त्याच्या भाषेतून व्यक्त होत असतात आणि म्हणून ग्रामीण साहित्यिकांनी आपापल्या बोली भाषेतूनच ते साहित्य लिहील्यामुळे ती भाषा टिकून राहते आणि त्या भाषेतील संकेत प्रचलित राहतात. अनेक ग्रामीण साहित्यिकांनी आपल्या ग्रामीण

भाषेचा वापर आपल्या लिखाणात केलेला दिसतो. अशाप्रकारे ग्रामीण साहित्याचे सामाजिक, सांस्कृतीक, भाषिक योगदान गावाच्या विकासासाठी कारणीभूत ठरू शकतात. व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' उध्दव शेळके यांची 'धग'. हमीद दलवाई यांचे 'इंधन' विश्वास पाटीच यांची 'झाडाझडती' सदानंद देशमुख यांची 'बारोमास' व 'तहान' यासारख्या ग्रामीण विषयावरच्या कादंबऱ्यामधून शिवाय काही ग्रामीण कविता काही ग्रामीण कथा, ग्रामीण वगनाट्य हे सर्व साहित्य या ना त्या ग्रामीण साहित्य व ग्रामीण विकास परस्पर संबंध.

साहित्य आणि समाज यांचा नेहमीच परस्पर संबंध राहिलेला आहे. समाजाचे चित्रण साहित्यात उमटत असतेच आणि साहित्यातून ही समाजाला एक दिशा मिळत असते. मग ते साहित्य जर समाजाशी, समूहाचे जोडणारे असले तर आपसूकच त्यातील विचारांचे, कृतीचे समाज समर्थन करत असतो. ग्रामीण साहित्य हे असेच ग्रामीण समूहाशी, ग्रामीण समाजाशी जोडणारे साहित्य आहे. ग्रामीण जीवनाचे, ग्रामसंस्कृतीचे, ग्रामपरंपरेचे, ग्रामीण चालीरीतीचे आणि त्यासोबतच ग्रामीण समस्यांचे दर्शन ग्रामीण साहित्यातून प्रभावीपणे व्यक्त होत आले आहे. साहित्याला सामाजिक बांधिलकीचे मूल्य असते. कारण साहित्य हे केवळ रंजनासाठी नसते, तर समाजात ज्या समस्या आहे त्या समस्यापर्यंत पोहोचण्यासाठी साहित्याचा उपयोग होत असतो. आणि यालाच आपण सामाजिक बांधिलकी म्हणतो, आणि ही सामाजिक बांधिलकी बाळगूनच काही लेखक सातत्याने लेखन करत असतात. ग्रामीण साहित्याचा आणि ग्रामीण विकासाचा विचार करताना सामाजिक बांधिलकीचे हे तत्व अनेक लेखक पाळताना दिसतात. ग्रामीण परिसरातील शेतकऱ्यांच्या, दलितांच्या, अशिक्षितांच्या, बेरोजगारीच्या, ग्रामीण विकासाच्या समस्यांना ग्रामीण साहित्य हे नेहमीच तोंड फोडत असल्याचे आपल्याला दिसून आलेले आहे. प्रत्यक्षपणे साहित्यातून त्या समस्या स्पष्ट झाल्या म्हणजे त्या सुटल्या असे नसते. परंतु व्यापकपणे शिक्षित समाजासमोर, वाचकांसमोर त्या समस्या तो लेखक घेऊन जात असतो आणि त्याचा कुठेतरी फायदा हा ग्रामीण विकासासाठी होत असतो. ज्याप्रमाणे अनेक सामाजिक चळवळीतून साहित्य हे मोठे झालेले आपण पाहतो, त्याचप्रमाणे अनेक साहित्यिक चळवळीतून सामाजिक परिवर्तन झालेले ही आपणास दिसून आले आहे. ग्रामीण साहित्याची चळवळ ही ग्रामीण विकासासाठी कारणीभूत झाल्याचे आपल्याला अनेक लेखकांच्या लेखनातून आढळून आले आहे. ग्रामीण साहित्याची चळवळ ही ग्रामीण विकासासाठी कारणीभूत झाल्याचे आपल्याला अनेक लेखकांच्या लेखनातून आढळून आले आजहे. अनेक ग्रमीण जाणीव निर्माण करणारे साहित्य लिहिले आणि मग ग्रामीण भागातील सामाजिक काम करणाऱ्या लोकांनी या साहित्यातून गावाला विकासाच्या दिशेने पुढे नेले. ग्रामीण विकासाची चळवळ ही सामाजिक पातळीवर राब होती. त्यातून मग त्या साहित्याला बळ मिळत गेले. सारांश काय तर ग्रामीण साहित्याने ग्रामीण भागातील अनेक प्रश्न पुढे आणले. कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा विविध ग्रामीण साहित्य प्रकारातून उमटलेले प्रश्न ग्रामीण विकासालही कारणीभूत ठरत आहे आणि महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण साहित्यातून लेखन करणाऱ्या लेखकाचा संघर्ष जर सामाजिक संस्कृती सांस्कृतिक अअश्शा विविध बदलांच्या दृष्टिकोनातून जे अन्याय किंवा समस्या घेऊन पुढे येतात त्यातून मग प्रेरणा घेऊन अनेक जण ग्रामविकासासाठी काम करायला उद्युक्त होतात. अशा रीतीने कुठेतरी ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण विकास यांचा परस्पर संबंध असल्याचे आपणास दिसून येते.

**संदर्भ :**

ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले – स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २६ जनेवारी २००७

ग्रमीण साहित्य चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान : डॉ. सुधाकर शेलार – स्वरूप प्रकाशन,
औरंगाबाद. प्र.आ. २ ऑक्टोबर २००९.

ग्रामीण साहित्य आणि संस्कृती : मोहन पाटील स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद – प्र.आ. जुलै २००२.

ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या : आनंद यादव – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे – प्र.आ. एप्रिल १९७८.

मराठी कादंबरी आस्वाद यावा : संपादक विजया राजाध्यक्ष – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – प्र. आ. २००८.